<u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>
<u>(अनुज्ञापन अतिक्रमण निर्मूलन खाते)</u>
क्रमांक सआ/ एम / प / ओडी / १०१/अनु.(अति.निर्मू.)दिनांक २०.११.२०२६
<u>एम/पश्चिम विभाग</u>
<u>स्वारस्य अभिव्यक्ती</u> <u>जाहिरात</u>

विषय एम/ पश्चिम विभागामध्ये अतिक्रमण निर्मूलन वाहनावर अशासकीय संस्थेकडून दिनांक ०४.१२.२०२६ ते दिनांक ३१.०३.२०२७ पर्यंत (कार्यादेश दिल्याच्या दिनांकापासून ९४ दिवस सार्वजनिक सुट्टी व साप्ताहिक सुट्टी वगळून) १२ कंत्राटी कामगार घेण्याबाबत.

एम/ पश्चिम विभागामध्ये अतिक्रमण निर्मूलन वाहनावर कंत्राटी कामगार घेण्याबाबत एका अशासकीय संस्थेची निवड करण्यात येणार आहे. सदर वाहनावर काम करण्याचा अनुभव असणाऱ्या किंवा महानगरपालिकेच्या इतर विभागामध्ये कामगार पुरवठा केल्याचा अनुभव असणा-या एम/ पश्चिम विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या इच्छुक स्थानिक नोंदणीकृत मजूर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औदयोगिक सेवा सहकारी संस्था (महिला बचत गट, विविध मंडळ आणि एम/ पश्चिम विभागातील सध्या कार्यरत स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान, रस्ते स्वच्छता योजना मधील संस्थाना वगळून) इत्यादी संस्थाकडून अर्ज (बंद लिफाफा) मागवण्यात येत आहेत. संस्थेची पात्रता यादी तयार करुन सोडत पध्दतीने निवड करण्यात येईल. निवड झालेल्या संस्थेकडून प्रति दिन सकाळी ७.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत (सकाळ/संध्याकाळ सत्र किंवा ब्रेक डयुटी) एकूण – १२ कामगाराची आवश्यकता आहे.

एम/पश्चिम विभाग कार्यालय, दुसरा मजला, वरिष्ठ निरीक्षक अनुज्ञापन (अति. निर्मू.) यांच्या कार्यालयात कामाच्या रक्कमेच्या रुपये अंदाजे ३९९३ +७१९ (१८% जीएसटी) एकूण रुपये ४७१२ रोख स्वरुपात भरुन (ना परतावा) दिनांक २५.११.२०२६ ते दिनांक ०४.१२.२०२६ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.३० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत अर्जाचा नमुना मिळू शकेल. अर्ज करण्याचा कालावधी दिनांक २५.११.२०२६ ते दिनांक ०४.१२.२०२६ पर्यंत (रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.३० ते सायंकाळी ०५.०० असेल. अर्ज करण्याचा अंतिम दिनांक ०४.१२.२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत असेल. नमुद केलेल्या कालावधीनंतर दाखल करण्यात आलेले अर्ज (बंद लिफाफा) विचारात घेण्यात येणार नाहीत.

निकषानुसार पात्र असलेल्या संस्थेच्या सूचीमधून सोडत पध्दतीने निवड झालेल्या संस्थेला योजनेच्या अटी व शर्तीसापेक्ष **सहाय्यक आयुक्त, एम/पश्चिम विभाग हे कामाचे वाटप** करतील. पात्र / अपात्र असलेल्या संस्थेची सुची फलकावर प्रदर्शित केली जाणार नाही. सोडत पध्दतीची निकाल प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त एम/ पश्चिम विभाग यांना राहतील.

अर्ज करण्याची अंतिम दिनांक ०४.१२.२०२६ पर्यंत (सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत) असेल.

निविदा सोडत दिनांक. ०७.१२.२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजता काढण्यात येईल.

सही/- २०.११.२०२६.
सहाय्यक आयुक्त एम/पश्चिम विभाग
एम/पश्चिम विभाग कार्यालय इमारत,
शारदभाऊ आचार्य मार्ग, चेंबूर (पूर्व) मुंबई - **४०००७१.**